|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव-425001**

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001**

'A' GRADE
(NAAC RE-ACCREDITED)
3rd Cycle

जा.क्र.उमवि/६/प्र.पा./एम.एस्सी./ ११२ /२०१८ | दिनांक :- ०९ जूलै,२०१८

**प्रति,**

१) उमवि परिसरातील सर्व पदव्युत्तर विज्ञान (एम.एस्सी.) प्रशाळेचे मा.संचालक / विभाग प्रमुख यांना

२) उमविशी संलग्नित सर्व पदव्युत्तर विज्ञान (एम.एस्सी.) महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना-

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पदव्युत्तर एम.एस्सी./एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष अभ्यासक्रमाची ऑनलाईनद्वारे प्रवेश प्रक्रियेसंदर्भात कार्यशाळा आयोजित करणेबाबत...

**महोदय,**

आपणास विदितच आहे की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक प्रशाळेतील / विभागातील विविध एम.एस्सी./एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन केंद्रिय पध्दतीने राबविली जात आहे. विद्यापीठाने सदरच्या प्रवेश प्रक्रियाबाबत कार्यक्रमपत्रिका यापुर्वी जाहिर करण्यात आली आहे.

यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, पदव्युत्तर एम.एस्सी./एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये संदर्भात आपल्या प्रशाळेतील / विभागातील / महाविद्यालयातील जे अध्यापक / समन्वयक कामकाज हाताळत असतील त्यांची कार्यशाळा दिनांक ११ जूलै,२०१८ रोजी २.०० वाजता विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एन्व्हॉयर्मेंटल ॲण्ड अर्थ सायन्सेस,उमवि,जळगांव येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेमध्ये आपल्या महाविद्यालयासाठी वरील प्रवेश प्रक्रियेसंदर्भात Login ID व Password दिला जाणार आहे, त्यामुळे आपल्या प्रशाळेतील / विभागातील / महाविद्यालयातील संबंधीत अध्यापक / समन्वयक यांची कार्यशाळेत उपस्थिती आवश्यक आहे. तरी सदर कार्यशाळेस उपस्थित रहावे ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
प्रवेश / पात्रता विभाग

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-**

मा. वित्त व लेखाधिकारी,उमवि.,जळगाव

पत्र पेटी क्र.:८०,उमविगर,जळगांव,दूरध्वी क्र.०२५७-२२५८४२८ ते २२५८४३८,फॅक्स क्र.:०२५७-२२५८४०३,४०६ प्रवेश / पात्रता विभाग फो i.०२५७-२२५७२९२,२२५७४०८
Post Box No.:80,Umavinagar,Jalgaon Telephone Nos,:0257-2258428 to 2258438,Fax Nos,:0257-2258403,406 E-mail Id : registrar@nmu.ac.in